पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
(पुर्वीचे सोलापूर विद्यापीठ) ( Formerly Solapur University)
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
☎: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३०० संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in
ईमेल - dbee@sus.ac.in ● परीक्षा व मूल्यमापन विभाग ● विस्तारीत क्रमांक - १३०

**संदर्भ -** पुअहोसोवि/परीक्षा विभाग/२०२३-२०२४/553 दि. 5 MAR 2024

**परिपत्रक क्रमांक-** 14

**विषय - सर्व पदवी व पदव्युत्तर या अभ्याक्रमांच्या प्रात्यक्षिक Viva/Dissertation/शारीरिक शिक्षण परीक्षेचे आयोजन करण्याबाबत.**

प्रस्तुत विद्यापीठाच्या विद्यापीटीस्तरीय होणाऱ्या **सर्व पदवी व पदव्युत्तर व शारीरिक शिक्षण** या अभ्यासक्रमांच्या सत्रनिहाय/वर्षनिहाय प्रात्यक्षिक **Viva/ Dissertation /शारीरिक शिक्षण** परीक्षेचे नियोजन हे महाविद्यालये/संकुले त्यांच्या अधिकारात खालील सुचनांचे पालन करुन करण्यात यावे.

१. मार्च/एप्रिल २०२४ या परीक्षा सत्रापासून वरील नमुद प्रात्यक्षिक परीक्षेचे वेळापत्रक हे संबंधीत महाविद्यालाने/संकुलाने संबंधीत सर्व सत्राची लेखी परीक्षा सुरु होण्यापूवी सर्व पदवी अभ्यासक्रमाच्या तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रत्यक्षीक परीक्षा सर्व सत्राची परीक्षा संपल्यानंतर दहा दिवसात संपेल अशा पध्दतीने नियोजन करुन महाविद्यायाच्या/संकुलांच्या नोटीस बोर्डावर प्रात्यक्षिक परीक्षेचे वेळापत्रक लावण्यात यावे. संबंधीत वेळापत्रक हे महाविद्यालयाचे प्राचार्य/संकुलाचे संचालक यांच्या अधिकाराने प्रसिध्द करावे.

२. प्रात्यक्षिक विषयाचे परीक्षेचे अंतर्गत/बहिस्थ परीक्षकांचे नेमणुकीचे आदेश हे संबंधीत त्या-त्या विषयासाठी महाविद्यालयाचे प्रायार्य/संकुलाचे संचालक यांच्या स्वाक्षरीने देण्यात यावी. परीक्षकांच्या नेमणुका महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम २०१६ पोटकलम ४८/३ अन्वये परीक्षकांच्या यादीनुसार करण्यात यावेत. ज्या विषयाचे काही कारणास्तव इतर विद्यापीठाचे बहिस्थ परीक्षक उपलब्ध होत नसल्यास अशा वेळी संबंधीत विषयाचे प्रस्तुत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांचे/संकुलांचे पॅनलमध्ये नमुद असणारे परीक्षकांची नेमणुक बहिस्थ परीक्षक म्हणून करण्यात यावी.

३. संबंधित विषयांचे प्रत्याक्षिक परीक्षेचे वेळापत्रक तसेच परीक्षक यांची नेमणूक केलेल्या आदेशाची खालील दिलेल्या तक्त्यानुसार परीक्षा व मुल्यमापन विभागाकडे संबंधित विभागाच्या सर्व ईमेलवर पाठविणे आवश्यक आहे.

| Sr. No | Branch Name & Subject Name | Course Name | Date of Inspetion | Date of Exam | Time of Exam | Internal Examnier Name & Contact No | External Examiner Name & Contact no | Center Name |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | |

वरील तक्त्यातील सर्व परीक्षेचे मुल्यमापनाचे गुण हे मार्च/एप्रिल २०२४ च्या परीक्षेच्या सबंधीत विषयाचे वरील तक्त्यानुसार सदरची परीक्षा संपल्यानंतर दोन दिवसात ज्या त्या महाविद्यालयाच्या प्राचार्य /संकुलाचे संचालक यांना देण्यात आलेल्या Login मधून गुणांची Entry करण्यात यावी. तसेच Login मध्ये Entry केलेल्या गुणांची Data Synchronize करण्यात यावे. संबंधीत प्राचार्य/संचालक यांनी सदरील गुण पुढील परीक्षा संपल्यानंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या Statement of Categories of document नुसार महाविद्यालय / संकुलाकडे संबंधित परिक्षांचा निकाल जाहीर झाल्यानंतर किमान सहा महिने जतन करावे व त्यानंतर विद्यापीठाच्या गोडावून विभागाकडे निर्लेखनासाठी जमा करण्यात यावे. प्रात्यक्षिक परीक्षेच्या गुणाबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास प्रस्तुत विद्यापीठाने मागणी केल्यास महाविद्यालयाकडे संग्रहित असलेल्या कागदपत्रकांची मुळ सत्यप्रत सादर करावी लागेल.याची नोंद घेण्यात यावी.

{**टिप -** वरील प्रकारातील कोणत्याही गुणांकनाची मुळ अथवा सत्यप्रत Soft किंवा Hard Copy मध्ये विद्यापीठाकडे पाठवून देवू नये.}

**(डॉ.रोकडे.म.स.)**
**प्र. संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

प्रत माहितीसाठी व योग्यत्या कार्यवाहीसाठी - परीक्षा संगणक विभागास